# अण्णाभाऊ साठेः व्यक्ती आणि वाङ्मय

डॉ.सिंधू बाबाराव सोलापुरे
मराठी व प्रमुख,
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रं

अण्णाभाऊ साठे यांचे मूळ नाव तुकाराम होते. अण्णा हे त्यांना मिळालेले टोपणनाव आहे. आणि हेच नाव कायम राहिले. अण्णा भाऊ साठेंचा जन्म वाटेगावातला व बालपणही याच गावात गेले. दि.१ ऑगस्ट, १९२० या दिवसाला महत्त्व आहे. "या दिवशी टिळक बाबाचं मरण झालं तेच दिसाला तू जलमलास." अशी आईकडून त्यांना माहिती मिळाली. १९२० ते १९३० हा कालखंड दष्काळाने व्यापलेला व अतिशय जीवघेणी होता. अण्णाभाऊंचे बालपण दारिद्रयाने पिचलेले. साधारणपणे १८ ते २० वर्षे वाटेगावात डोंगरदऱ्यांच्या सानिध्यात त्यांनी घालविले. बेधुंद जगण्याचा त्यांना जडलेला छंद, सह्याद्रीच्या डोंगरमाथ्यावर रानोमाळ भटकंती ही त्यांची नित्याची आवड; परंतु तरीही जन्मदात्री आई व काळी माती ही त्यांची श्रद्धेय स्थाने होती.

महाराष्ट्राच्या अंगणात । सरिता ह्या खेळ खेळतात।
कोयना कृष्णा चालत । घालून हातामध्ये हात।
वारणा वाहे वेगात । वायूला लाजवीत ।

वारणेच्या वेगवान प्रवाहात डुबकी मारण्याचे त्यांचे वेड अफलातूच होते. हुंदडणे, बागडणे, खेळणे, शिकार करणे, गाणी गाणे, मध गोळा करणे, सुगीच्या हंगामात रानातील मेवा ओरबडून खाणे अशा स्वप्नस्थ अवस्थेत मनोरथ रचणे व कल्पनेच्या दुनियेत हरवून जाणे हे त्यांचे बालपणीचे वास्तव जीवन होते. कारण परिस्थितीचे चटके बसण्यापलीकडचे हे वय होते.

बालपणी त्यांना मर्दानी खेळ खेळण्याची फार आवड होती. त्यांचा हा पिढीजात वारसा होता. दांडपट्टा हा विशेष खेळ, कुऱ्हाड चालवणे, सूर पारंब्या खेळणे, धावणे, गाई-म्हशीच्या झुंजी लावणे, जनावरांच्या पाठीवर बसून दूरवर नदीच्या प्रवाहात पोहत जाणे, मासेमारी, खेकडे पकडणे ह्या बालपणीच्या सवयी होत्या. त्यातच पुढे गावागावांतील जत्रा, उरूस, तमाशा, जलसा, पोवाडे यांत रमले. लोकगीते पाठ करणे व ती गाणे, आख्यायिका ऐकणे अशा अनेक गोष्टी त्यांच्या जडणघडणीस कारणीभूत ठरल्या आहेत. बापू साठे या मावसभावाच्या तमाशात अण्णा काम करू लागले. नाचकाम

करण्यास बापू साठे यांनी त्यांना शिकविले. तमाशाचा फड हेच त्यांचे घर झाले. खेड्यांतील जत्रा-यात्रांना गेल्यानंतर दुकाने, माणसे, ठोकलेली पाले, कुस्त्या, तमाशा, डोंबाऱ्यांचे खेळ, पूजा, पालख्या, मिरवणूका, मुरळ्यांचे नाच, संगीत बाऱ्या, पोवाडे या सर्वांचे निरीक्षण अण्णा बारकाईने करीत असत. वाटेगाव परिसरातील एकही जत्रा त्यांनी कधी सोडली नाही. साधारणपणे १९३२ पर्यंतचा बालपणीचा तुकारामाचा काळ हा हुंदडण्यातच गेला. परंतु याच काळातील अनुभवांनी तुकारामाला भावी जीवनाच्या जगण्याची जडीबुटी मिळाली.

याच वयात अण्णाभाऊ साठेंच्या अवतीभोवती बालमित्रांचा नव्हे तर, वडील माणसांचा मेळ जमत असे. कारण या सर्वांना ते कथा, गोष्टी, आख्यायिका मन लावून सांगत असत. बापू साठे या मावसभावाबरोबर रेठऱ्याच्या यात्रेतील तमाशा फडात अनपेक्षितपणे क्रांतिसिंह नाना पाटील आले. त्यांचे या फडातील भाषण ऐकल्यानंतर अण्णांच्या मनात चैतन्याची लाट फुलून आली. त्यामुळे स्वातंत्र्याच्या रणकंदनात झोकून देण्याचा मनस्वी निर्णय त्यांनी घेतला. जीवघेणा संघर्ष व संघर्षाच्या आरंभापासून तरा लढाई अण्णाभाऊ निष्ठेने लढलेत. या संघर्षामध्येही त्यांनी आपल्यातला कलावंत जपला, सर्जनशील अशी साहित्यनिर्मिती केली.

आपल्या व्यक्तिगत जीवनाबद्दलचा वृत्तांत अण्णाभाऊंनी फारसा लिहिला नाही. वर्तमानपत्रातून किंवा कलापीठावरून त्या त्या प्रसंगी त्यांनी जे विचार मांडले त्यावरून त्यांचे आत्मचरित्र पूर्णरूपात समोर येत नाही. विपुल ग्रंथनिर्मिती करणाऱ्या अण्णाभाऊंनी स्वतःबद्दल न लिहिल्यामुळे त्यांचा समग्र पूर्वेतिहास वाचकांच्या हाती सापडत नाही. अण्णाभाऊ आयुष्यभर स्वतःला विद्यार्थी समजायचे. त्यामुळे विचारवंताचा किंवा समाजशिक्षकाचा आव त्यांनी आणला नाही. हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण होय. ते किती शिकले याबद्दल एकवाक्यता नाही. ते दुसरीपर्यंत शिकले असे एक मत आहे, तर ते व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत शिकले असे दुसरे मत आहे. हा मतांचा गोंधळ बाजूला केला तर अण्णाभाऊ फक्त दीड दिवसाची शाळा शिकले. म्हणजे शाळेत हजेरी लावण्याइतपत त्यांना विद्या मिळाली असे म्हणायला हरकत नाही. "आमची माणसं नुसती आढणी ढोरं हायत म्हणून इंग्रज लोक आमच्यावर राज्य करत्याती." भाऊ साठे यांच्या उद्गारातून त्यांच्या मनातील पांढरपेशीय प्रवृत्तीविषयीची नाराजी व दलित समाजाबद्दलची कणव स्पष्ट होते.

पुढे मुंबईतील मंतरलेल्या वातावरणात अण्णांना व्यापक क्षेत्र मिळाले. राष्ट्रीय आंदोलन, कम्युनिस्ट पार्टीचे कार्ड मेंबर, लाल बावटा कलापथकाचे प्रमुख भागीदार म्हणून काम करीत असताना 'जयवंताबाई' नावाच्या स्त्रीसोबत त्यांचे संबंध जुळले.

जयवंताबाई ह्या विवाहित होत्या. त्यांचा पुण्याजवळील लोणी काळभोर येथील सदाशिव दोडकेसोबत विवाह झाला होता. परंतु पतीला सोडून त्या भावाकडे राहत होत्या. जयवंताबाई कम्युनिस्ट पार्टीचे काम पाहात होत्या. १९४५ मध्ये आपल्या दोन मुली असूनही अण्णाभाऊसोबत नोंदणी पद्धतीने विवाह करून त्या त्यांच्याकडे कायमच्या रहायला आल्या. जयवंताबाईने अण्णाभाऊंसारख्या भटक्या व कलंदर माणसाच्या आयुष्याला लगाम घातला. आपल्या दोन मुलींच्या सहकार्याने व प्रेमाने अण्णांमधला कलावंत जीवापाड जपला. या बाईने अण्णाभाऊंसाठी काबाडकष्ट केले. भाजी विकण्यापासून तर परिचारिकेपर्यंत सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या. "या विवाहामुळे अण्णाभाऊंच्या भटकंतीला स्थैर्य प्राप्त झाले. जयवंताबाईंनी हा कलावंत जपला, जतन केला. पत्र्याच्या चाळीतील छोट्याशा घरात सात्विक ममतेच्या छायेत या कलाकाराची उदासीनता जयवंताबाईंनी निपटून टाकली. तिने अण्णाभाऊंना कष्टाचे काम करू दिले नाही. यामुळे अण्णाभाऊंच्या भणंग आयुष्याला घरपण प्राप्त झाले. या स्वास्थ्यामुळे त्यांची प्रतिभा बहरू लागली. आणि त्यांच्या हातून वास्तवाला, समाजजीवनाला स्पर्शन जाणाऱ्या कलाकृती निर्माण झाल्या." अण्णाभाऊ शाहीर, रचनाकार होते, परंतु लेखक किंवा साहित्यिक म्हणून आपली कामगिरी पार पाडण्यास जयवंताबाईनीच त्यांना प्रवृत्त केले.

माणूस हीच अण्णाभाऊंची खरी प्रेरणा होती. एका खांद्यावर दारिद्य व दुसऱ्या खांद्यावर दुःखाचे ओझे घेऊन चालत असताना देश, काळ, भाषा, धर्म, जात आणि पंथ या बंधनांतून त्यांनी स्वतःला मुक्त केले. त्यामुळेच ते मानवमुक्तीचे सूक्त गाऊ शकले. वारणा खोऱ्यात अण्णाभाऊंनी आपले बालपण व तारुण्य घालवल्यामुळे त्या देखण्या खोऱ्यातील मातीचे गुणधर्म त्यांनी आत्मसात केले. या खोऱ्यानेच अण्णांना खऱ्या अर्थाने प्रेरणा दिली.त्यांनी उभ्या केलेल्या माणसांबरोबर स्वतःची व्यथाही नकळत मांडली. मुंबईच्या बकाल वस्त्यांतील माणसे व कामगार वर्गाच्या भेसूर जगण्याकडे पाहून त्यांनी आपली लेखणी वापरल्यामुळेच एका भौतिकवादी विचाराची घडण त्यांच्याकडून घडली. माणूस हाच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. दलित, पीडितांच्या जीवनावर त्यांनी सतत लिहिले. दलित जीवनाच्या प्रेरणा त्यांनी अनुभवल्या होत्या. अण्णाभाऊ लिहू, वाचू लागल्यावर त्यांची वैचारिक बैठक घडविण्यात त्यांच्या जीवलग मित्रांचा फार मोठा वाटा आहे. शाहीर अमर शेख व शाहीर द. ना. गव्हाणकर यांनी अण्णाभाऊंना सतत लिहिते ठेवले. अण्णाभाऊ १९४१-४२च्या दरम्यान जेव्हा लिहायला लागले, तेव्हा आपण लेखक किंवा शाहीर होऊ असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला.

१९३४ च्या मुंबई गिरणी कामगारांच्या सार्वत्रिक संपात भाग घेऊन कॉ. साळवे व कॉ. मोरे यांच्याकडून मार्क्सवादी विचाराचे धडे घेतले. कार्ल मार्क्सचा अभ्यास त्यांनी केला नव्हता, पण जाणिवेच्या पातळीवर ते त्याच्याशी एकरूप झाले होते. मॅक्झिम गॉर्की त्यांनी वाचला होता. चिरागनगरातील झोपडीत गॉर्कीच्या अर्धाकृती पुतळ्याला स्मरणात ठेवूनच आपले साहित्य निर्माण केले. कॉम्रेड डांगे यांच्या प्रभावातून वैचारिक चिंतनाची बैठक लाभली. त्यामुळे अण्णाभाऊंसारखा लेखक लिहू लागला.

वाचनाचा ध्यास या वेडातून अण्णाभाऊंनी भाराभर पुस्तके वाचली. त्यांच्या घरातील छोट्या ग्रंथालयात जी पुस्तके होती, त्यावरून ही कल्पना स्पष्ट होते. महात्मा फुले, महर्षी शिंदे, कबीर, कालीदास, राहूल सांकृत्यायन,खलील जिब्रान, गॉर्की, मायकॉव्हस्की, डोस्टोव्हस्की, टॉलस्टॉय, तर्गेनिक, डॉ. आंबेडकर, ज्ञानेश्वर, वि. स. खांडेकर व इतर अनेक प्रतिथयशलेखकांच्या अप्रतीम कलाकृतींच्या वाचनातून त्यांना ऊर्जा मिळाली.

अण्णाभाऊंच्या लेखनविषयक कारकिर्दीचा व त्यांच्या एकूणच व्याप्त आंदोलनाचा प्रवाह तपासताना त्यांचे वैचारिक सामर्थ्य व जगण्याच्या निष्ठा प्रतीत होतात. अमानवी धर्म व अमानुष रूढी-परंपरांच्या जोखडातून 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय' अशी जीवनदृष्टी स्वीकारणारे सर्व परिवर्तनवादी शिल्पकार अण्णाभाऊंच्या दृष्टीत होते. बुद्ध, मार्क्स, गॉर्की, फुले, आंबेडकर, शाहू महाराज ही सर्व विचारपीठे अण्णाभाऊंनी अभ्यासली, तपासली व त्याच तत्त्वज्ञानातून आपली जीवननिष्ठा पक्की केली व तीच बैठक त्यांनी कायमची अंगिकारली. त्यामुळे या सर्व प्रेरणांचा प्रभाव त्यांच्या मनात आपोआप रुजला. हरहुन्नरी व अतिशय जागृत व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले अण्णाभाऊ देव, धर्म, दैववाद, धर्मवाद व सनातन संस्कृती नाकारतात. या सर्व पारंपरिक संचितांविरुद्ध त्यांनी पारदर्शक भूमिका स्वीकारली होती. कोणतीही चुकीची पारंपरिकता वाढविणारी विचारसरणी त्यांना स्पर्श करू शकली नाही. याचाच अर्थ असा की, एकतर अण्णाभाऊंनी ज्ञानविज्ञानाचा बडेजाव मान्य केला होता; तर दुसरीकडे त्यांनी सत्यशोधक भूमिका अंगिकारली होती.

अण्णाभाऊंची वाङ्मयीन दृष्टी त्यांच्या शाहिरीतून प्रतिबिंबित झाली आहे. 'जो कलावंत जनतेची कदर करतो, त्यांचीच कदर जनता करते.' या विचारांत लोकांच्या सुख-दुःखाचा हुंकार मुखरित झाला आहे. जनतेला बदल हवा आहे म्हणून दुनिया बदलण्याची त्याची भूमिका निश्चितपणे क्रांतीची उगवती पायवाट ठरली. 'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाड्यात अण्णाभाऊ लिहितात, "संस्कृत भाषेचे अभिमानी स्वतःला विद्येचे धनी समजतात. त्यांनी ज्ञानाची मक्तेदारी स्वतःकडे ठेवली आहे. संस्कृतचे अवडंबर

माजवून त्यांनी महाराष्ट्रावर घोर अन्याय केला आहे. त्यांनी मराठीला दडवले आहे, हीन लेखले आहे आणि महाराष्ट्राला दीन केले आहे. महाराष्ट्राची प्रगती रोखली आहे."

**अण्णाभाऊंचे साहित्य : कथा**

अण्णाभाऊ साठे यांनी मराठीला समृद्ध कथा दिली आहे. एकूण वीस कथासंग्रह त्यांच्या नावावर जमा आहेत. त्यांनी पहिली कथा १९४९ मध्ये लिहिली. मात्र पहिला कथासंग्रह प्रकाशित होऊन वाचकांसमोर आला तेव्हा गावकुसाबाहेरचे व मुंबईतले भयानक वास्तव त्यांच्या कथेचा विषय झाले. आशय, विषय, भाषा, संवाद व मांडणी या सर्वच बाबतीत अण्णाभाऊंची कथा समृद्ध आहे. त्यांचा दुसरा कथासंग्रह 'बरबाद्या कंज़ारी' हा आहे. आपली कथा निर्मितीची मीमांसा करताना अण्णाभाऊ म्हणतात, "मी माझी कथा लिहायला प्रारंभ केला. तत्पूर्वी मी तमाशे, पोवाडे, गाणी लिहीत होतो. आपला हा शाहिरीचा धंदा करीत मी कथाही लिहिल्या" अण्णाभाऊंच्या कथा हिंदी, सिंधी, बंगाली, मल्याळी, जर्मन, ब्रेक, इंग्लिश, पॉलिश, रशियन अशा भारतीय व परदेशी भाषांत प्रकाशित झाल्या. त्यामुळे अण्णाभाऊंच्या कथेतून दलित कथेची पहाट उगवली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. दलितांच्या स्वप्नांना, त्यांच्या जगण्याला, त्यांच्या भावभावनांना अण्णाभाऊंनी आत्मियतेने चित्रित केले आहे.

अण्णाभाऊ ग्रामीण भागात, गावकुसाबाहेर जगले. तिथली जीवघेणी स्पर्धा आणि मुंबई शहरातील झोपडपट्टीतील भीषण संघर्ष यांचा अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या कथेतून मराठी मातीचा गंध सर्वत्र दिसतो. अण्णाभाऊंच्या कथेबद्दल 'फकिरा' कादंबरीच्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकर म्हणतात, "अण्णाभाऊंच्या कथेत विनोद नसतो असे नाही. पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. यानं फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं त्याला दर्शन घडलं आहे. साहजिकच त्यांच्या कथा मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण असतात. ग्रामीण कथाकार म्हणून दिघे, माटे, ठोकळ, भोसले यांच्यापासून व्यंकटेश माडगूळकर, मिरासदार, शंकर पाटील, रणजीत देसाई यांच्यापर्यंत अनेकांची नावे तुम्ही ऐकली तरी तिचा ढंग या सर्वांच्यापेक्षा अगदी निराळा आहे."" अण्णाभाऊंची कथा मराठीतील सर्व कथाकारांपेक्षा आशयाच्या अंगाने संपन्न आहे.

**कादंबरी** :

अण्णाभाऊंनी एकूण बत्तीस कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ग्रामीण, प्रादेशिक, झोपडपट्टीविषयक, दलित, पतित, शोषित, आदिवासी, गिरिजन, गुन्हेगार, कर्तबगार स्त्रिया असा समग्र शोषितांचा पसारा त्यांच्या कादंबरीत पसरलेला आहे. त्यांच्या प्रत्येक कादंबरीचा विषय वेगवेगळा असला तरी, सर्वच कादंबऱ्यांतून अभिव्यक्त होणारे दुःख

मात्र सारखेच आहे. अण्णाभाऊंनी मार्क्सवादी विचारसरणी आत्मसात केली असली तरी, इथली सांस्कृतिक परंपरा त्यांच्या मनात परिपूर्ण भिनली होती. देव, दैव व दैववाद या धर्म-पंथाच्या भोवती पोसलेली भाकड परंपरा तसेच समाजात जी विकृती निर्माण झाली ती बदलण्यासाठी आपल्या साहित्यातून नैतिक मूल्यांवर त्यांनी भर दिला.

अण्णाभाऊंच्या सगळ्या कादंबऱ्या सहानुभूतीतून निर्माण झालेल्या आहेत. अण्णाभाऊ म्हणतात, "प्रतिभेला वास्तवाची गरज असते, कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असतात. अनुभूतीला सहानुभुतीची जोड नसेल, तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागत नाही.ज्यांच्याविषयी मी लिहितो ती माझी माणसं असतात." यावरून अण्णाभाऊंनी आवतीभोवतीच्या दीन, दुःखी माणसांचे अंतरंग ओळखून त्यांना न्याय मिळवून देण्याचा सतत प्रयत्न केला. 'वारणेच्या खोऱ्यात' ही गाजलेली कादंबरी महान रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की याला त्यांनी अर्पण केली. आपल्या कादंबरी वाङ्मयातून संघर्ष मांडणाऱ्या अण्णाभाऊंना लोकपरंपरा व तमाशा क्षेत्रांतील अनुभव होता.

चित्रा या कादंबरीमध्ये सामाजिक आशय व एकाकी जीवन जगणाऱ्या स्त्रीच्या जगण्याचा प्रश्न गहन असून शीलरक्षण करणे तिला बऱ्याचदा कठीण जाते पुरुषी अहंकाराने पछाडलेलांडगे स्त्रीच्या शिदाचे लचके तोडतात याची चित्र आले आहे. फकीरा ही अण्णाभाऊ साठे यांची महत्त्वाची कादंबरी आहे या कादंबरीवर साम्यवादाचा प्रभाव दिसून येतो. अनेक पुरस्काराने या कादंबरीला सन्मानित करण्यात आलेले आहे याविषयी बाबाराव गुरव म्हणतात, "अण्णाभाऊंचा मास्टरपीस फकीरा ही कादंबरी आहे तिला धरून मी तिचे विवेचन करणार आहे तिची तुलना महाश्वेता देवींच्या बिरसा मुंडा वरील कादंबरीशी केली की फकीराची महत्त्व कळू शकते दोन्ही कादंबऱ्या ऐतिहासिक आहेत पण इतिहासाचे जेवढे साधन फकीरा आहे. तेवढी महाशिवतादेवींची कादंबरी नाही." मांग या जातीला इंग्रज सरकारने दिवसासाठी तीनदा चावडीवर हजेरी लावण्याचा हुकूम काढला हा माणूस कायदा काढून संबंध मांग जातीलाच चोर दरोडेखोर ठरविले गेले या कायद्याविरुद्ध मांग जातीने दिलेला प्रभावी लढा या कादंबरीचा विषय आहे.

वैजयंता ही स्त्रियांचे घेऊन आलेली व कलावंतांच्या जीवनाचा वेध घेणारे मराठीतील श्रेष्ठ कादंबरी आहे. माकडीचा माळ मध्ये भटक्या जमातीचा आयुष्य क्रम चितारताना दुर्गा सारख्या निष्पाप मुलीवर आलेल्या विविध संकटाचे दर्शन अण्णाभाऊंनी घडविले आहे. वारणेचा वाघ या कादंबरीतून सत्तूच्या पुरुषार्थ प्रधान जीवनदृष्टीचा प्रत्यय तो सत्तू अन्यायाविरुद्ध लढताना शेवटपर्यंत माघार घेत नाही. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातून माणसांच्या सर्व प्रकारचा विषमतेवर एक अर्थाने नियतीचे

झगडा आहे तो शब्दातून पकडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दलित जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा अनुभव आकारास आणण्याची मनीषा बाळगली व वास्तवदर्शी चित्रण सर्व साहित्यातून केलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) डॉ. बाबुराव गुरव : अण्णा भाऊ साठे, समाजविचार आणि साहित्य विवेचन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९४, पृ.६

२) डॉ. विमलकुमार देखमुख : साठे वंशावळ (संशोधन पत्रिका) देशमुख प्रकाशन, नागपूर, १९८२, पृ.४

३) प्रा. मच्छिंद्र सकटे : अण्णा भाऊ साठे : एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर २००५, पृ.३१

४)प्रा. मच्छिंद्र सकटे : अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, २००५ पृ.१८०

५) अण्णा भाऊ साठे : लो.अ.सा. निवडक वाङमय (संपा.), अर्जुन डांगळे, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, १९९८, पृ.११७६

६) अण्णा भाऊ साठे : उद्धृत, अण्णा भाऊ साठे जीवन आणि साहित्य, नानासाहेब कठाळे, अ.सा.सा. प्रकाशन मंच, नागपूर, द्वि.आ., २००१, पृ.१३३